महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य), पुणे
दूसरा व तिसरा मजला , नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर , कॅम्प , पुणे

दूरध्वनी क्र-०२० २६०५००६ Email ID :dlrmah.mah@nic.in Web site https://mahabhumi.gov.in

क्र.रा.भू.३/DCS /रब्बी-२०२४/सहायक/२०२४ पुणे, दिनांक: १३/११/२०२४

प्रति,

**जिल्हाधिकारी, सर्व**

**विषय : संपूर्ण राज्यात रब्बी हंगाम २०२४ पासून ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करणेबाबत.**

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, कृषी विभाग शासन निर्णय क्र संकीर्ण -२०२४/प्र.क्र १५७/१०-अे, दिनांक १४/१०/२०२४.

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयाप्रमाणे संपूर्ण राज्यात रब्बी हंगाम २०२४ पासून ई-पीक पाहणी डिजीटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे पीक नोंदणी करावयाची आहे. दिनांक १ डिसेंबर २०२४ पासून राज्यातील सर्व गावांमध्ये रब्बी हंगाम २०२४ सुरू करण्यात येत आहे. या प्रकल्पात शेतकरी स्तरावरून व सहायक स्तरावरून मोबाईल ॲपद्वारे पिकांची नोंद करण्यात येणार आहे. तद् अनुषंगाने खालील प्रमाणे रब्बी हंगाम २०२४ करिता कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे.

| शेतकरी स्तरावरील ई-पीक पाहणी | | सहायक स्तरावरील ई-पीक पाहणी | |
|---|---|---|---|
| हंगाम | कालावधी | हंगाम | कालावधी |
| रब्बी | १ डिसेंबर २०२४ ते १५ जानेवारी २०२५ | रब्बी | १६ जानेवारी २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२५ |

सुरवातीला शेतकरी स्तरावरून Mobile App द्वारे ई-पीक पाहणी नोंद करण्यात येते व शेतकरी स्तरावरील कालावधी संपल्यानंतर सहायकांमार्फत उर्वरित शेतकऱ्यांची पीक पाहणी Mobile App द्वारे नोंदवण्यात येते. तसेच **डिजीटल क्रॉप सर्वे** (DCS) मध्ये गटाच्या हद्दीवर आधारित Geo Fencing बंधनकारक करण्यात आलेली आहे म्हणजेच जोपर्यंत संबधित खातेदार/सहायक निवडलेल्या गटात जाऊन पीक पाहणी करत नाही तो पर्यत पिकांचे छायाचित्र काढता येत नाही व पीक पाहणी upload करता येत नाही. Geo Fencing बंधनकारक असल्यामुळे **गाव नकाशे अद्यावत असल्याची खात्री भूमी अभिलेख कार्यालयामार्फत** करून घेणे आवश्यक आहे.

शेतकरी स्तरावरून नोंदवलेल्या ई-पीक पाहणी पैकी १०% तपासणी साठी ग्राम महसुल अधिकारी यांना उपलब्ध करून देण्यात येईल. **शेतकरी स्तरावरील कालावधीत १० % ई-पीक पाहणी तपासणी करणे ग्राम महसुल अधिकारी यांची जबाबदारी आहे.** शेतकरी स्तरावरील कालावधी संपल्यानंतर १० % तपासणी प्रलंबित असलेली ई-पीक पाहणी ग्राम महसुल अधिकारी यांना तपासता येणार नाही व अशी ई-पीक पाहणी

auto-approve होऊन गाव नमूना १२ वर दर्शविण्यात येईल. जर अशी **१० % तपासणी न झालेली ई-पीक पाहणी चुकीची असल्यास अथवा भविष्यात काही वाद उद्भवल्यास ग्राम महसुल अधिकारी जबाबदार असतील.**

शेतकरी स्तरावरील पीक नोंदणी कालावधी संपल्यानंतर उर्वरित शेतकऱ्यांची पीक नोंदणी सहायक मोबाईल ॲपद्वारे पूर्ण करेल. त्या अनुषंगाने आपल्या जिल्ह्यातील प्रत्येक गावासाठी मानधन तत्वावर सहायकाची नेमणूक करणे आवश्यक आहे. तालुका स्तरावर **प्रत्येक गावासाठी तहसीलदार आदेशाद्वारे सहायकांची नेमणूक** करतील.

**सहायक नेमणूक करण्यासाठी तहसीलदार स्तरावरील कार्यपद्धत्ती**

१. तहसिलदार प्रत्येक गावासाठी एक सहाय्यकाची नियुक्ती खालील शासकीय कर्मचारी यांचे मधून करतील — कोतवाल, ग्राम रोजगार सेवक, आशा सेविका व ग्रामस्तरीय मानधनावर कार्यरत इतर विभागांचे कर्मचारी.
२. जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट करिता एक सहायक या प्रमाणे सहाय्यकाची नियुक्ती करण्यात येईल.
३. एक गाव किंवा अनेक गावे एकत्र करून जास्तीत जास्त १५०० ओनर्स प्लॉट संख्ये पर्यंत पीक पाहणी साठी सहाय्य करणे व उर्वरित पीक पाहणी नोंदविणे हे काम काज एका सहायकाला देता येईल.
४. कमी ओनर्स प्लॉट असणाऱ्या गावांचे एकत्रीकरण करून २ किंवा त्या पेक्षा जास्त गावे एका सहाय्यकास नेमून देण्यात येतील.
५. ज्या गावांमध्ये १५०० पेक्षा जास्त ओनर्स प्लॉट आहेत त्या गावांमध्ये १ पेक्षा अधिक सहायकांची नेमणूक करता येईल.
६. कोणत्याही परिस्थितीमध्ये एका साहायकाकडे १५०० ओनर्स प्लॉट पेक्षा जास्त ओनर्स प्लॉटचे काम काज देता येणार नाही.
७. सहायक नेमणूक केल्यानंतर सहायक म्हणून काम करण्यासाठी संबंधित कर्मचारी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे पीक पाहणी नोंदवू शकतील.

**सहायकाची जबाबदारी:**

१. सहायक हा शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधी मध्ये शेतकऱ्यांना पीक पाहणीसाठी मदत करेल व त्यांना येणार अडचणी सोडवेल.
२. शेतकरी स्तरावरून किमान ८० %पीक पाहणी पूर्ण होईल याची खात्री करेल .
३. शेतकरी स्तरावरील पीक पाहणी कालावधी संपल्यावर उर्वरित खातेदारांची ई-पीक पाहणी कर्मचारी डिजिटल क्रॉप सर्वे (DCS) मोबाईल ॲप द्वारे मधून त्यांचे लॉगीन ने पूर्ण करणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडेल .
४. शेतकरी स्तरावरून नोंदवण्यात आलेल्या पीक नोंदीपैकी १०० % पडताळणी सहायक स्तरावरून करण्यात येईल.
५. सहायक स्तरावरून नोंदविण्यात आलेल्या नोंदीची १००% पडताळणी ग्राम महसुल अधिकारी यांचेमार्फत करण्यात येईल त्यानंतर ई-पीक पाहणी गांव नमूना १२ वर प्रतिबिंबित करण्यात येईल.

६. शेतकरी स्तरावरील नोंद केलेली पीक पाहणी ४८ तासांपर्यंत मोबाईल ॲप मध्ये दुरुस्त अथवा नष्ट करू शकतील.

७. शेतकरी स्तरावरून गांव नमूना १२ वर प्रतिबिंबित करण्यात आलेल्या ई-पीक पाहणी मध्ये आवश्यक असल्यास ग्राम महसुल अधिकारी दुरुस्ती अथवा पीक नोंद नष्ट करतील. ग्राम महसुल अधिकारी यांनी नष्ट केलेली ई-पीक पाहणी सहायक स्तरावरून पुनः ई-पीक पाहणी नोंद करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

८. सहायक स्तरावरून नोंद करण्यात आलेली ई-पीक पाहणी ग्राम महसुल अधिकारी स्तरावरून नष्ट केल्यास पुनः सहायकांना मोबाईल ॲप द्वारे ऑनलाईन पीक नोंदणीसाठी उपलब्ध होईल.

९. मंडळ अधिकारी : मंडळ अधिकारी मोबाईल ॲपद्वारे व्हेरीफायर म्हणून लॉगिन करतील. ग्राम महसुल अधिकारी यांनी दोनदा नाकारलेल्या सर्व पीक पाहणीच्या नोंदीची पडताळणी करून मोबाईल ॲप द्वारे नोंदी करतील.

तरी उपरोक्त प्रमाणे रब्बी हंगाम २०२४ च्या पूर्व तयारीसाठी प्रत्येक गावासाठी सहायकाची नेमणूक करणे व गाव नकाशे अद्यावत असल्याची खात्री करणे याकरीता आपल्या जिल्ह्यातील सर्व तहसिलदार व उप-अधिक्षक भूमी अभिलेख यांना आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात. तसेच **सहायक नेमणूकीच्या आदेशाची प्रत इकडील कार्यालयास पुढील दोन दिवसात सादर करण्यात याव्यात.**

**Signed by Niranjan Kumar Sudhansu**
**Date: 16-11-2024 22:29:45**

**(निरंजन कुमार सुधांशु)**
**जमाबंदी आयुक्त आणि संचालक,**
**भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे**

प्रत:- **विभागीय आयुक्त,** सर्व यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव